विषय :- वाहतूक/निर्यात परवाने मंजूर करताना घ्यावयाची दक्षता.

वाचले : १] या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सीएलआर. एफएलआर. ११८७/वाहतूक/पंधरा दि. २३/१२/१९८७.
२] या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सीएलआर. ११९१/११३९/पंधरा दि. १०/२/१९९२.

- - - - - - - - -

परिपत्रक

क्र. सीएलआर/एफएलआर/११२०००/ नि. प. /सात. मुंबई, दिनांक 23 नोव्हेंबर, २०००.

देशी/विदेशी मद्यावर मुल्याधारित कर आकारणी पद्धत जानेवार १९९७ पासून अंमलात आल्यापासून देशी व विदेशी मद्यांच्या वाहतूक परवान्यांच्या नमुन्यात बदल विहीत केले आहेत. वाहतूक परवान्यावरील सदर बदलाप्रमाणे एकाच ब्रँडच्या दोन वेगवेगळ्या बॅचची विक्री एका वाहतुक परवान्यावर केली असल्यास ती वेगवेगळी दाखविणे आवश्यक आहे. जरी वरीलप्रमाणे अपेक्षा असली तरी सीएल-१ व पीएलएल/बीआरएल अनुज्ञप्ती मधून देशी/विदेशी मद्य, बिअरचे वितरण होत असताना तसेच एफएल-१ व सीएल-२ अनुज्ञप्तीमधून मद्याचे किरकोळ विक्रेत्यांना विक्री होत असताना एकाच ब्रँडच्या दोन वेगवेगळ्या बॅचची माहिती स्वतंत्र दिली जात नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. सबब राज्यातील सर्व पीएलएल, सीएल-१, बीआरएल व एफएल-१ अनुज्ञप्तीच्या प्रभारी अधिका-यांना तसेच सीएल-२ अनुज्ञप्ती धारकांना कळविण्यात येत आहे की यापुढे वरीलप्रमाणे बॅचनिहाय माहिती वाहतुक परवान्यात नमूद करण्याऐवजी एकत्रित माहिती नमुद केल्याचे आढळल्यास त्याची जबाबदारी घटकाच्या प्रभारी अधिका-यावर तसेच सीएल-२ अनुज्ञप्ती धारकावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त सूचना महाराष्ट्रातून इतर राज्यात निर्यात होणा-या विदेशी मद्य, बिअरसाठीही लागु राहतील. तशा नोंदी घेण्याची जबाबदारी पीएलएल/बीआरएल घटकाच्या प्रभारी अधिका-यावर राहिल. परराज्यातुन आयात होणा-या मद्याच्या परवान्यावर वरीलप्रमाणे बॅच निहाय व ब्रँड निहाय माहिती देण्यात आली नसल्यास ज्या एफएल-१ धारकाने मद्य आयात केले त्या एफएल-१ अनुज्ञप्तीच्या प्रभारी अधिका-यांनी वाहतुक परवान्यावर मद्य निर्गमित करताना सुद्धा वरील सूचनांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घ्यावी. यापुढे पीएलएल/सीएल-१/बीआरएल/एफएल-१ अनुज्ञप्तीचे निरीक्षण करताना संबंधित निरीक्षण करणा-या अधिका-यांना अनुज्ञप्ती धारकांच्या गोदामात शिल्लक मद्य साठा ब्रँड निहाय, बॅच निहाय व बाटल्यांच्या आकारमानानुसार नोंदवह्यातील शिल्लक साठ्याशी

स. जिल्हाधिकारी ठाणे
अवलोकनार्थ

... २ ..

जुळत असल्याची खात्री करून घेण्याची जबाबदारी निरीक्षण करणा-या अधिका-यावर निश्चित करण्यात येत आहे. निरीक्षण करणा-या अधिका-याने अशी तपासणी न केल्यास कालांतराने साठ्यात तफावत आढळल्यास त्याची जबाबदारी घटकाच्या प्रभारी अधिका-याबरोबर निरीक्षण करणा-या अधिका-यांचीही राहिल. अधिक खुलासा म्हणुन नमुद करण्यात येते की, प्रत्येक निरीक्षणाच्या वेळी संपूर्ण शिल्लक साठा मोजला पाहिजे. असे नाही मात्र किमान एका बॅचचे/ ब्रँडची/एका आकाराच्या बाटल्यांची संपूर्ण तपासणी करून नेमकी कोणती तपासणी केली त्याच्या नोंदी व्हिजिट बुक (Visit Book) मध्ये घेणे बंधनकारक राहिल.

वहातुक व निर्यात परवान्यावर वर उल्लेख केल्याप्रमाणे ब्रँड बॅच व आकारमाना नुसार सर्व नोंदी करून त्यानुसारच मद्य वितरित केल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित घटकाच्या प्रभारी अधिका-यावर राहिल. मद्याची वहातुक करणा-या वहानाची वहातुकीत किंवा संबंधित अनुज्ञप्तीधारकाच्या ठिकाणी तपासणी करताना ब्रँड, बॅच व बाटल्यांचे आकार यात तफावत आढळल्यास प्रभारी अधिका-यांना जबाबदार धरून ते कारवाईस पात्र ठरतील.

कोणता ब्रँड, बॅच, बाटल्यांच्या आकारमानानुसार कसे वर्णन असावे हे दर्शविणारा नमुना तक्ता जोडला आहे.

वहातुक, आयात, निर्यात परवान्यांवर तो मंजूर करणा-या अधिका-याचे नाव व हुद्दा नमुद करणे बंधनकारक ठरविण्यात येत आहे. सध्या काही अधिकारी अधिकारी केवळ हुद्दा लिहुन स्वाक्षरी करताना आढळतात. ही बाब प्रशासकिय दृष्ट्या योग्य नाही. सबब परवाने मंजूर करणा-या अधिका-यांनी सहीखाली नाव व हुद्दा सुस्पष्ट दिसेल हे पहाण्याची दक्षता घ्यावी.

या परिपत्रकाच्या प्रती सर्व अधीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील

१] सर्व पीएलएल, सीएल-१, बीआरएल व एफएल-१ घटकांच्या तसेच सदर घटकांचे प्रभारी अधिकारी यांना पुरवुन त्यांची पोच प्राप्त करून दप्तरी ठेवावी.

२] सर्व सीएल-२ घटकांना देण्यात याव्यात व त्याची पोच प्राप्त करून घ्यावी.

३] जिल्ह्यातील इतर कार्यकारी अधिका-यांना देऊन त्यांची पोच प्राप्त करून घ्यावी.

... ३ ..

या परिपत्रकातील सूचनांचा भंग झाल्यास संबंधित घटक पुढे नमूद केलेल्या अनुज्ञप्तीच्या अटींचा व नियमांचा भंग केल्याबद्दल मुंबई दारुबंदी कायदा १९४९चे कलम ५४ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

| अ.क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार | अनुज्ञप्तीची अट / नियम |
|---|---|---|
| १. | पीएलएल | अट क्र. ११ |
| २. | पीआरएल | अट क्र. ९ |
| ३. | सीएल १ | अट क्र. ९ |
| ४. | एफएल १ | मुंबई विदेशी मद्य नियमावली १९५३ चा नियम २१८[३]ब |
| ५. | सीएल २ | अट क्र. १३ |

संबंधित घटकाचे प्रभारी अधिकारी आणि निरीक्षण करणारे अधिकारी शिस्तभंगाची कारवाई करण्यास पात्र ठरतील.

सोबत- एक विवरण

आनंद भी. कुलकर्णी
[आनंद भी. कुलकर्णी]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति

१. सर्व जिल्हाधिकारी यांस सस्नेह
२. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
४. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
५. कार्यासन क्र. १२ [५ प्रती]

DETAILS OF THE LIQUOR ALLOWED TOBE TRANSPORTED FROM

| Sr. No. | Name of brand | Strength | Size of bottle | No. of bottles | No. of cases | Batch No. | Month of manu- facture | Manuf- acturing cost per bottle | MRP (Approved) | Excise duty Reco- vered | Transport Fee Recovered | Challan No. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | XXX | 25 U P | 750 ML | 300 | 25 | 138 | Sept. 2000 | AA | BB | | | |
| 2. | XXX | 25 U.P | 750 ML | 120 | 10 | 139 | Sept. 2000 | AA | BB | | | |
| 3. | YYY | 25 U.P | 375 ML | 96 | 4 | 78 | Aug. 2000 | CC | DD | | | |
| 4. | YYY | 25 U P | 375 ML | 120 | 5 | 81 | Aug. 2000 | CC | DD | | | |
| 5. | ZZZ | 25 U P | 180 ML | 480 | 10 | 151 | Sept 2000 | EE | FF | | | |
| 6. | ZZZ | 25 UP | 180 ML | 960 | 20 | 153 | Sept. 2000 | EE | FF | | | |

Total No, of Liquor Cases issued

Total Excise Duty recovered

Place

Date

Name / Designation
Manufactory Officer